प्रभात पुणे, बुधवार, दि. १५ जून २०१६

# शंभर वर्षांची दिल... दोस्ती... आणि दुनियादारीही..!

## सर परशुराम महाविद्यालयाला शंभर वर्षे पूर्ण : जुन्या आठवणींमध्ये रंगला शताब्दी सोहळा



पुणे : सर परशुराम महाविद्यालयाला १४ जून रोजी शंभर वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त महाविद्यालयाला आकर्षक रोषणाई करण्यात आली होती.



पुणे : कॉलेज उभारणीत योगदान देणार्या व्यक्तींच्या वंशजांचा सत्कार सिक्कीमचे राज्यपाल श्रीनवास पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

**पुणे, दि. १४ (प्रतिनिधी)** - गेल्या शंभर वर्षांची साक्ष असणारी ती ऐतिहासिक वास्तू.. या वास्तूच्या साक्षीने घडलेली प्रत्येक मैत्री.. आणि जुन्या आठवणीत रंगलेली दिल..दोस्ती आणि दुनियादारी.. हे सगळंच भारावून टाकत जणू शंभर वर्षे मागे घेऊन जाणारं..! सर परशुराम महाविद्यालयाला मंगळवारी शंभर वर्षे पूर्ण झाली यानिमित्ताने महाविद्यालयात आजी माजी विद्यार्थ्यांसह सर्वांचा जणू मेळाच भरला होता.

शिक्षण प्रसारक मंडळीचे सर परशुरामभाऊ महाविद्यालयाला मंगळवारी शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त शतजन्म शोधताना या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे उपाध्यक्ष श्रीकृष्ण चितळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप शेठ आदी उपस्थित होते. महाविद्यालयातील ऐतिहासिक लेडी रमाबाई सभागृहामध्ये हा कार्यक्रम झाला. महाविद्यालयाची ऐतिहासिक वास्तू लोकमान्य टिळक, जगन्नाथ महाराज पंडित आणि सर परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या सहकार्यामुळे उभी राहिली. याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी यावेळी टिळक, पंडित व पटवर्धन कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. पाटील यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या व्हिजन डॉक्युमेंटचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी पाटील म्हणाले, स.प.मध्ये मनातली कळी फुलली, त्याचे निर्माल्य होऊ देणार नाही, अशा भावना व्यक्त करीत सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील यांनी आठवणींचा हा मळा आणखी फुलवला. या सोहळ्याला आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांची मोठी गर्दी झाली होती. प्रत्येक जण जणू आपली हरवलेली मैत्री या गर्दीत शोधत होता. आपल्या बॅचचे कोणी या निमित्ताने तरी भेटतंय का, हे पाहण्यासाठी अनेक जण आवर्जून वेळ काढून आले होते. यावेळी अनेक जण भावुकही झाले होते. यावेळी श्रीनिवास पाटील हेदेखील महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असल्याने मुख्य सोहळ्यात त्यांनी आठवणींना उजाळा दिला. १९५७ मध्ये महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतरचे दिवस आपल्या खुमासदार शैलीत सांगत उपस्थितांमध्ये हसविले. पूर्वीचे दिवस, तसा आनंद आता राहिला नाही, पण आपण पुन्हा हा आपुलकीचा मळा फुलवूया, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

ॲड. जैन म्हणाले, शिक्षणाला सामाजिक बांधिलकीची जोडही मिळायला हवी. अभ्यासक्रमामध्ये कुटुंब, संस्कृती, राष्ट्रीय संस्कृती, सामाजिक बांधिलकी अशा गोष्टींचाही समावेश करण्याची गरज आता निर्माण झाली आहे. डॉ. दिलीप शेठ यांनी प्रास्ताविक करताना महाविद्यालयाच्या उपक्रमांची माहिती दिली.